VINOD C. SAMPAT
ADV. HIGH COURT
16, YASHODA NIWAS
OPP. R.N. GANDHI HIGH SCHOOL
NEAR SOMAIYA COLLEG
VIDYAVIHAR (E) BOMBAY-400 077
Tel. Off : 513 80 95 / 516 88 89
: 512 12 59
Resi : 513 36 53 / 515 66 32

(1 copy) 7 (7) (C)

क्रमांक: सगृयो-१०९५/प्र.क्र. ३६/१४-सी.
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १० मार्च, १९९५.

आदेश

ज्या अर्थी सहकारी संस्था अधिनियम कलम ३२ मध्ये सहकारी संस्थेच्या सभासदांना आपल्या सहकारी संस्थेमधील कोणती कागदपत्रे निःशुल्क पाहता येतील तसेच कोणत्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध होतील याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे, आणि

ज्या अर्थी सहकारी संस्थांचे नियम १९६१ मधील नियम क्र. 30 मध्ये सभासदांना निबंधकाचे कार्यालयात संस्थेची कोणती कागदपत्रे शुल्क देऊन मिळविता येतील याबाबतची तरतूद करण्यात आली आहे, आणि

ज्या अर्थी ब-याच सहकारी गृहनिर्माण संस्थांविरुध्द सभासदांनी शासनाकडे व निबंधकांच्याकडे सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे स्वतःसंबंधी कागदपत्रांची मागणी करुनही कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत, तसेच सहकारी कायदा कलम ३२ व नियम 30 मधील तरतूदीकडे बोट दाखवून सभासदांशी जरी संबंधित असली तरीही इतर कागदपत्रे पाहण्यास अथवा त्याच्या प्रती देण्यास सुध्दा नकार देत असतात, अशा तक्रारी वारंवार येत असतात, आणि

ज्या अर्थी कायद्याचे कलम ३२ चा रोख कोणती कागदपत्रे सभासदांना विनामूल्य तपासणीला देणे बंधनकारक आहे यावरच आहे, आणि नियम 30 कोणते कागदपत्र निबंधकाचे कार्यालयातून तपासणीस मिळतील अथवा उपलब्ध करुन देता येईल तत्संबंधी आहे आणि ज्या अर्थी सभासदांना त्यांचे संस्थेशी आर्थिक व्यवहारासंबंधी संबंधित असलेले इतर कोणतीही कागदपत्रे तपासावयाची असतील तर तशा तपासणीला परवानगी देणे सहकारी तत्वास धरुनच आहे आणि कायदा/नियमाप्रमाणे तशा तपासणीला कोणतीही बाधा नाही आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने देखील आहे.

म्हणून शासन लोकहिताच्या दृष्टीने सहकारी कायदा कलम ७९ अ मधील अधिकाराचा वापर करुन सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या सभासदांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यासंबंधी खालीलप्रमाणे

पृ.मा.पा.

007 CIRCULAR STATING MEMBERS CAN INSPECT THE RECORDS OF THE SOCIETY AND CAN TAKE CERTIFIED TRUE COPIES OF VARIOUS RECORDS ADV. VINOD C. SAMPAT & CO.

ADV. HIGH COURT
10, YASHODA NIWAS
OPP. R.N. GANDHI HIGH SCHOOL
NEAR SOMAIYA COLLEG
VIDYAVIHAR (E) BOMBAY-400 077
Tel. Off.: 513 80 95 / 516 88 89
: 512 12 59
Resi: 513 36 53 / 515 66 32

निदेश देत आहे :-

"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ३२ व महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम ३० प्रमाणे देय असलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदाने स्वतः अथवा प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्याचे संस्थेशी निगडीत आर्थिक व्यवहारासंबंधीचे संस्थेचे दस्तऐवज/कागदपत्रांच्या तपासणीची लेखी मागणी केल्यास विनाविलंब आणि कोणत्याही परिस्थितीत ७ दिवसांचे आत सदरची कागदपत्रे तपासणीकरिता उपलब्ध करून देण्यात येईल. अशी तपासणी विनामूल्य देण्यात येईल. मात्र कार्यकारी समितीमध्ये ठराव करून (सर्वसाधारण सभेमध्ये कायम करण्याच्या अधीन राहून) प्रती तासाला रु. १० पेक्षा जास्त नाही असे शुल्क तपासणीला आकारता येईल. संबंधित कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केल्यास सभासदांच्या स्वखर्चाने अथवा संस्थेला होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे विनाविलंब आणि कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसांचे आत पुरविण्यात येईल. कागदपत्रांची नक्कल पुरविण्यासंदर्भात वरीलप्रमाणे आकारण्यात येणारे शुल्क आणि सध्या अस्तित्वात असलेले नियम/संस्थेचे उपविधीमध्ये आणि उपरोल्लेखित शुल्कामध्ये तफावत असल्यास नियमामधील/उपविधीमधील उल्लेखित दर लागू राहतील."

वरील निदेश हे निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श. मू. कलाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

प्रत:-

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (सर्व),
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व),
४) अध्यक्ष, मुंबई जिल्हा सहकारी संस्थांचे महासंघ विकास प्रिमायसेस, फोर्ट, मुंबई,
५) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

त्यांना विनंती आहे की, सदर आदेश शासन राजपत्र असाधारण भाग-४(ब) दि. १० मार्च, १९९५ मध्ये प्रकाशित करून त्याच्या १०० प्रती या विभागाला पाठवाव्यात.

(श. मू. कलाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

007 CIRCULAR STATING MEMBERS CAN INSPECT THE RECORDS OF THE SOCIETY AND CAN TAKE CERTIFIED TRUE COPIES OF VARIOUS RECORDS
ADV. VINOD C. SAMPAT & CO.